लोक LIVE
तुमच्या मनातलं...!
www.lokshahilive.com

१९५५ पासून निर्भिड लिखाण करणारे व महिलेने चालविलेले स्वतंत्र दैनिक

# लोकशाही

इंटरनेट आवृत्ती - www.lokshahilive.com, https://www.facebook.com/lokshahilive/

Download Our Apps
www.lokshahilive.com

जळगाव, शनिवार, दि.१० मे २०२५ | RNI NO.MAHMAR/2009/33028, REG.NO.JAL/16/2024-26 | ● अंक -१८१ ● पाने ६ ● किंमत ३ रु.

## सोने-चांदी

- सोने (प्रति १० ग्रॅम) : ९३,३९०
- चांदी (प्रति १ किलो): ९६,२७०

## तापमान

- कमाल : ४२ अंश सेल्सिअस
- किमान : २५ अंश सेल्सिअस

# पाकिस्तानसोबत तणाव, केंद्राचं नोटिफिकेशन; लष्कर प्रमुखांना विशेष अधिकार बहाल, पॉवर वाढली

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नवी दिल्ली** वृत्तसंस्था

पाकिस्तानसोबत तणाव वाढलेला असताना केंद्र सरकारनं महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. लष्कराचे प्रमुख उपेंद्र द्विवेदी यांना प्रादेशिक लष्करातील प्रत्येक अधिकारी आणि भरती झालेल्या प्रत्येक व्यक्तीला आवश्यक सुविधा देण्याचे अधिकार दिले आहेत. त्यामुळे लष्कर प्रमुखांची ताकद वाढली आहे.

पहलगाम हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारतानं ऑपरेशन सिंदूर राबवलं. हवाई हल्ले करुन दहशतवाद्यांचे ९ तळ बेचिराख करण्यात आले. भारताच्या कारवाईनं चिडलेल्या पाकिस्ताननं दुसऱ्याच दिवशी भारताच्या १२ शहरांवर हवाई हल्ल्याचे प्रयत्न केले. पण एस-४०० हवाई सुरक्षा यंत्रणेनं सगळे हल्ले हाणून पाडले. यानंतर भारतानं पाकिस्तानी शहरांवर ड्रोनच्या माध्यमातून प्रतिहल्ला चढवला. या सगळ्या घडामोडींमुळे भारत आणि पाकिस्तानचे संबंध अतिशय ताणले गेलेले आहेत. अशा परिस्थितीत राष्ट्रीय सुरक्षा मजबूत करण्यासाठी, आपत्कालीन



परिस्थितीत सैन्याची तत्परता निश्चित करण्यासाठी केंद्र सरकारनं महत्त्वाचे अधिकार दिले आहेत.

केंद्र सरकारनं ९ मे २०२५ रोजी एक अधिसूचना जारी केली. यामुळे लष्कर प्रमुखांना प्रादेशिक सेनेच्या नियमांच्या अंतर्गत विशेष अधिकार प्रदान करण्यात आल्या आहेत. या अधिसूचनेनुसार, लष्कर प्रमुख आता प्रादेशिक सेनेच्या सर्व अधिकारी आणि जवानांना खालील उद्देशांसाठी बोलावू शकतात.

१. आवश्यक सुरक्षा प्रदान करण्यासाठी- स्ट्रॅटर्जिक ठिकाणं, संवेदनशील भागांची सुरक्षा निश्चित करणं.

२. नियमित लष्कराचं समर्थन- युद्ध, आपत्ती किंवा अन्य आपत्कालीन परिस्थितींमध्ये नियमित लष्कराची क्षमता वाढवणं

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढलेला असताना केंद्र सरकारनं घेतलेला निर्णय महत्त्वाचा आहे. २२ एप्रिल २०२५ रोजी जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जण मारले गेले. यात २५ पर्यटकांचा समावेश होता. दहशतवाद्यांनी धर्म विचारुन त्यांच्यावर गोळ्या घातल्या. त्या हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारतानं ७ मे रोजी पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांचे ९ तळ जमीनदोस्त केले.

## महत्वाचे

### जळगावसह १३ जिल्ह्यांना वादळी पावसाचा इशारा



**मुंबई :** देशावर युद्धाचं सावट असताना पावसाने राज्यातचं नाहीतर देशात थैमान घातले आहे. अनेक भागांमध्ये वादळाचं सावट पाहायसला मिळत आहे. हवामान विभागानं वर्तवलेल्या प्राथमिक अंदाजानुसार पुढच्या २४ तासांमध्ये राज्याच्या मध्य महाराष्ट्र आणि विदर्भामध्ये वादळी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर, कोकण किनारपट्टी भागात ढगाळ वातावरणासह हवामान काहीसे दमट असणार आहे असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

**कोणत्या जिल्ह्यांना दिला वादळी पावसाचा इशारा ?**
सातारा, पुणे, नाशिक, कोल्हापूर, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, छत्रपती संभाजीनगर, धुळे, जळगाव, नंदुरबार या जिल्ह्यांना हवामान खात्याकडून वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचं आवाहनदेखील हवामान खात्याकडून करण्यात आले आहे.
राज्यात एकाएकी गेल्या ४८ तासांपासून पावसानं हजेरी लावल्यामुळं ऊन्हाची तीव्रता कमी झाली असून, तापमानातही सुखद घट झाल्याचं पाहायला मिळत आहे. बहुतांश भागांमध्ये हवेत गारवा निर्माण झाला असून, राज्याच्या पश्चिम घाट परिसरामध्ये पहाटेच्या वेळी धुक्याची चादर पाहायला मिळत आहे.

### जिल्हा परिषदेचा वार्षिक प्रशासन अहवाल प्रसिद्ध

**जळगाव :** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (वार्षिक प्रशासन अहवाल) नियम १९६४ मधील नियम ९ नुसार जळगाव जिल्हा परिषदेचा सन २०२३-२०२४ चा वार्षिक प्रशासन अहवाल प्रसिद्ध करण्यात आला आहे. जिल्हा परिषदेच्या ठराव क्रमांक ७५१, दिनांक ३० सप्टेंबर २०२४ रोजी हा अहवाल अधिकृतपणे मंजूर करण्यात आला.
मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल (भाप्रसे) यांच्या सहीने जाहीर करण्यात आलेल्या या अहवालात जिल्हा परिषदेकडून वर्षभरात करण्यात आलेल्या विविध विकासकामांचा, योजनांचा व प्रशासनिक कार्याचा आढावा देण्यात आला आहे.
सदरील अहवाल जळगाव जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षमतेचे प्रतिबिंब असून, शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी, आरोग्य, शिक्षण, ग्रामविकास व सामाजिक कल्याण क्षेत्रातील प्रगती यांचा समावेश त्यामध्ये करण्यात आला आहे. जिल्ह्यातील नागरिक, संशोधक, पत्रकार व शासकीय कर्मचारी यांच्यासाठी हा अहवाल उपयुक्त ठरणार आहे.

# शेतकऱ्यांच्या तक्रारींसाठी कृषी विभाग सज्ज

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**सोयगाव** प्रतिनिधी

खरीप हंगाम २०२५ दरम्यान तालुक्यातील शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण बियाणे, खते आणि कीटकनाशके योग्य दराने उपलब्ध व्हावीत आणि त्यांची फसवणूक होऊ नये, यासाठी सोयगाव तालुक्यात कृषी निविष्ठा केंद्रांची नियमित तपासणी केली जात आहे. यासोबतच, शेतकऱ्यांच्या तक्रारींचे त्वरित निवारण करण्यासाठी तालुकास्तरावर तक्रार निवारण कक्ष स्थापन



करण्यात आले आहेत, अशी माहिती पंचायत समितीचे कृषी अधिकारी संतोष भालेराव यांनी दिली.
शेतकऱ्यांना कृषी निविष्ठांच्या खरेदीत अडचणी येऊ नये आणि गुणवत्तेसंदर्भातील तक्रारींचे रितनिराकरण व्हावे, यासाठी हे कक्ष कार्यरत असतील. तक्रारींसाठी शेतकऱ्यांनी लेखी अर्जासह खरेदी पावती, सातबारा, होल्डिंग आदी कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. तक्रार अर्जावर शेतकऱ्यांनी पत्ता, गाव, तालुका आणि भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करावा. तालुका कृषी अधिकारी किंवा पंचायत समितीच्या कृषी अधिकारी कार्यालयात या तक्रारी नोंदवता येतील. शेतकऱ्यांनी कृषी निविष्ठा खरेदी करताना अधिकृत विक्रेत्यांकडूनच खरेदी करावी, पक्की पावती घ्यावी आणि त्यावर बियाणे उत्पादनाचा लॉट नंबर, उत्पादन पान २ वर »

# विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार सोहळा

## राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते होणार पुरस्कार प्रदान

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

कामगार विश्वात प्रतिष्ठेच्या असलेल्या कामगार भूषण पुरस्कार आणि विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कारांचे मंगळवार, दि. १३ रोजी वितरण करण्यात येणार आहे. राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या हस्ते राज्यातील ५२ कामगारांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.
यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.निलम गोऱ्हे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर, कामगार राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, सर्व स्थानिक खासदार व आमदार, तसेच कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय.ए.कुंदन, विकास आयुक्त तुकाराम मुंढे, कामगार आयुक्त डॉ.एच.पी.तुम्मोड, कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा होणार आहे.

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, प्रभादेवी, मुंबई येथे मंगळवार दि.१३ मे रोजी सायंकाळी पाच वाजता पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी प्रदान करण्यात येणारे पुरस्कार सन २०२३ मधील असून छत्रपती संभाजीनगर येथील बजाज ऑटो लिमिटेडचे कामगार श्रीनिवास कोंडिबा कळमकर यांना कामगार भूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. रु.५० हजार, स्मृतीचिन्ह आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. तसेच राज्यभरातील ५१ कामगारांना विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून पुरस्कार्थींना प्रत्येकी रु.२५ हजार, स्मृतीचिन्ह आणि मानपत्र प्रदान करण्यात येणार आहे.
नोकरी करत असतानाच विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा, संघटन आदी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या कामगारांना राज्य शासनाच्या पान २ वर »

# मुक्ताईनगरात ४३४ बांधकाम कामगारांना गृह उपयोगी संचाचे वाटप

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुक्ताईनगर** प्रतिनिधी

मुक्ताईनगर येथे योजना कल्याणकारी सर्वसामान्यांच्या दारी या उपक्रमात नोंदणी केलेल्या इमारत बांधकाम कामगारांना गृह उपयोगी संचाचे (भांडी) वाटप करण्यात आले. ४३४ लाभार्थींना संच वाटप करण्यात आले. याआधी मुक्ताईनगर शहरात कामगारांच्या ऑनलाईन नोंदणीसाठी देखील कॅम्प लावण्यात आला होता.



आमदार चंद्रकांत पाटील यांनी स्थानिक ठिकाणी नागरिकांना लाभ घेता यावा म्हणून या कॅम्पचे आयोजन केलेले आहे. महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून ही योजना राबवली जात असते. त्यातून कामगारांच्या मुलांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती तसेच आरोग्यासाठी पाच लाखाचा विमा, मृत्यू पश्चात आर्थिक मदत, सुरक्षा संच, गृह उपयोगी वस्तू संच असे फायदे पान २ वर »

## धानोऱ्यात केळी-पपईचे नुकसान; तत्काळ पंचनाम्याचे आदेश

# एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही – पालकमंत्री पाटील

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**धानोरा ता. चोपडा** प्रतिनिधी

नुकत्यांच झालेल्या वादळ व गारपीटसह अवकाळी पावसामुळे धानोरा मंळात केळी पपईच्या बागा जमिनदोस्त झाल्याने शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे त्याची दखल घेत पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील आ. प्रा. चंद्रकांत सोनवणे जिल्हाधिकारी मा. आयुष प्रसाद



जिल्हा कृषी अधिकारी कुर्बान तडवी प्रांताधिकारी नितीन कुमारजी मुंगटीवार तहसिलदार भाऊ साहेब थोरात यांनी गुरुवारी सकाळी ९: ३० वाजता धानोरा परिसरात प्रत्यक्ष शेतात जाऊन . केळी व पपई बागाच्या नुकसानीची पाहणी केली शेतकर्याच्या बांधावर जाऊन ता त्काळ पंचनामे करा कोणत्याही पान २ वर »

## जयघोषात साकारला भक्तीचा सोहळा

# संत सखाराम महाराज रथोत्सव उत्साहात

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**अमळनेर** प्रतिनिधी

संत सखाराम महाराजांच्या जयघोषात मोहिनी एकादशीला रथोत्सवाला विधिवत पूजा करून रात्री ८ वाजता सुरुवात झाली.यंदा पासून रथ ट्रॅक्टरने ओढायला सुरुवात झाल्याने भाविकांना निवांतपणे रथाला स्पर्श करून दर्शन घेता आले आणि प्रदक्षिणाही घालता आली.

सायंकाळी प्रसाद महाराजांच्या हस्ते विठ्ठल रुख्मिनी मंदिरात पूजा व आरती करण्यात आली.यावेळी ईश्वरदास महाराज,नंदगावकर , भक्तराज महाराज मुल्हेरकर ,खासदार स्मिता वाघ,माजी नगराध्यक्ष जयश्री पाटील,भैरवी पलांडे,उपविभागीय अधिकारी नितीनकुमार मुंडावरे,डीवायएसपी विनायक कोते,परिविक्षाधीन डीवायएसपी केदार बारबोले,तहसीलदार रुपेशकुमार सुराणा,पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम,पोलीस उपनिरीक्षक मंगला पवार मुख्याधिकारी तुषार नेरकर, अभियंता डिगंबर वाघ,अभियंता



सुनील पाटील,नायब तहसीलदार कुलकर्णी,माजी नगराध्यक्ष विनोद पाटील,माजी नगराध्यक्ष सुभाष चौधरी,डॉ अनिल शिंदे,विश्वस्त ॲड रवींद्र देशमुख,दिलीप देशमुख,डॉ डिगंबर महाले,राजश्री पाटील हजर होते.
विश्वस्तानी लालजींची मूर्ती मंदिराबाहेर आणली.अभय देव व आरती देव या दाम्पत्याने रथाची पूजा केली व लालजींची मूर्ती रथावर स्थानापन्न केली. अनिष वैद्य,अथर्व वैद्य पान २ वर »

# केसीई महाविद्यालयात परिसर मुलाखती; २० विद्यार्थ्यांची निवड

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

खान्देश कॉलेज ऑफ एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट महाविद्यालयांत परिसर मुलाखतीचें आयोजन करण्यात आले होते . या आठवड्यात दोन परिसर मुलाखतीचे आयोजन करण्यात आले . त्यात यू के बी इलेक्ट्रॉनिक्स प्रा .लिमिटेड पुणे आणि आयवरोली फार्मा नासिक



यांचे विद्यमाने मुलाखती घेण्यात आल्या . विविध शाखेच्या ५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी मुलाखती दिल्या . त्यात २० विद्यार्थ्यांची निवड झाली. विद्यार्थ्यांचे कौशल्य ,सवांद ,वाचन, लेखन पान २ वर »

# फुटबॉल सुपर कॉर्पोरेट लीगमध्ये जैन इरिगेशनची विजयी सलामी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

मुंबई फुटबॉल असोसिएशन आयोजित सुपर कॉर्पोरेट लीग स्पर्धेत जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. कंपनीच्या फुटबॉल संघाने सर्वाधिक गोल करत स्पर्धेत विजयी सलामी दिली आहे.
मुंबई फुटबॉल असोसिएशन आयोजित सुपर कॉर्पोरेट लीगचा पहिला सामना बांद्रा नवेल



डिसूजा ग्राऊंडवर झाला. संपूर्ण स्पर्धेत कॉर्पोरेट जगतातील १६ संघांनी सहभाग घेतला. 'ए' व 'बी' गृप मध्ये ही स्पर्धा होत आहे. यात जळगावच्या जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. कंपनीचा फुटबॉल संघ पहिल्यांदा सहभागी झाला. जैन इरिगेशनचा पहिला सामना नेव्हल डॉकयार्ड सोबत ६ मे ला झाला. पान २ वर »

# "टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग वीक"मध्ये 24 स्टार्टअपनी केले सादरीकरण

## स्टार्ट अप रोड मॅप या माहितीपर पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** वृत्तसंस्था

एकेकाळी भारताचा जगभरात व्यापार होता. घराघरात लघु आणि कुटीर उद्योगही सुरु असायचे, त्यामुळेच भारताला सोने की चिडिया म्हटले जात होते. देशाला पुन्हा ते वैभव मिळवून देण्यासाठी स्टार्टअप ही लोकचळवळ व्हायला हवी, असे प्रतिपादन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी



केले. आज सहभागी झालेल्या कार्यक्रमात शासनाच्या सहा विभागांनी र्स्टाटअप्स सोबत काम करण्यास अनुमती दर्शवली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्रातील प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण संस्कृती निर्माण करण्याच्या उद्देशाने सामान्य प्रशासन विभागामार्फत ''टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग वीक '' हा ५ ते ९ मे दरम्यान कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमात महाराईज-र्स्टाअप पिचींग सेशन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंत्री श्री.लोढा बोलत होते.

कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा वर्मा,उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी,आयुक्त आर.विमला, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपुर्वा पालकर, महाराष्ट्र पान २ वर »

## पान १ वरून

## शेतकऱ्यांच्या तक्रारींसाठी...

दिनांक आदी माहिती तपासावी. नोंदणीकृत आणि लेबल क्लेम असलेल्या निविष्ठांचीच खरेदी करावी, असेही आवाहन करण्यात येत आहे.

**खते, बी-बियाणे खरेदीसाठी मदत**

खते, बी-बियाण्यांची चढ्या भावाने विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा कृषी विभागामार्फत देण्यात आला आहे. खरीप हंगामात बी-बियाण्यांची तसेच खतांची कमतरता पडते. त्यामुळे पेरण्या तोंडावर असताना शेतकऱ्यांना भटकंती करावी लागते. काही ठिकाणी अधिक पैसे देऊन बी-बियाणे व खते खरेदी करावी लागतात. अशी अडचण शेतकऱ्यांना उद्भवू नये म्हणून सोयगावात तक्रार निवारण कक्ष स्थापन केले आहेत. या कक्षातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन होणार आहे.

## मुक्ताईनगरात ४३४ बांधकाम...

दिले जातात. गृह उपयोगी संचासाठी नोंदणी केलेल्या लाभार्थी यांना ७ मे रोजी सकाळी नऊ वाजेपासून ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत गृह उपयोगी संचाचे वाटप करण्यात आले. यावेळी आमदार चंद्रकांत पाटील यांच्या कन्या संजना पाटील व प्रियंका पाटील यांच्या उपस्थितीत या कॅम्पचे उद्घाटन करण्यात आले. पुढील गृह उपयोगी संचाचे वाटप साहित्य आल्यानंतर १२ मे पासून सुरळीत केले जाईल. वाटप ठिकाणी जास्त गर्दी होऊ नये म्हणून दर दिवशी वेळापत्रकानुसार तालुक्यातील चार गावातील लाभार्थी यांना गृह उपयोगी साहित्य वाटप केले जाईल. प्रत्येक गावाचा दिवस ठरून वेळापत्रकानुसार कॅम्पच्या ठिकाणी लावले जाईल. त्यानुसार मुक्ताईनगर तालुक्यातील नागरिकांनी ज्या दिवशी ज्या गावाची वाटप असेल त्या ठिकाणी जाऊन या योजनेचा लाभ घ्यावा. गृह उपयोगी संचासाठी स्वतः लाभार्थी उपस्थित असणे आवश्यक आहे. सोबत बांधकाम कामगार ओळखपत्र, नोंदणी केलेली ऑनलाइन पावती व आधार कार्ड हे कागदपत्रे घेऊन गृह उपयोगी संच देताना लाभार्थी यांचा ऑनलाईन फोटो काढून वितरण केले जाते.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचे कडून हे काम मिळाले असून मुक्ताईनगर येथील संच वाटपाचे काम सुरू आहे नोंदणी केलेले लाभार्थी यांनी या योजनेचा लाभ घ्यावा तसेच ही योजना मोफत आहे. खाजगी एजंट यांच्याकडून नागरिकांची लूट होत असते म्हणून त्यांना कोणीही पैसे देऊ नये.

**- प्रदिप साळी, गृह उपयोगी संच वाटप कंत्राटदार**

स्थानिक ठिकाणी आमदार चंद्रकांत पाटील यांनी कॅम्पचे आयोजन केल्याने तालुक्यातील नागरिकांची भटकंती थांबली आहे. ज्यांची नोंदणी नसेल त्यांनी नोंदणी करून घ्यावी व नोंदणी झालेल्या लाभार्थी यांनी कॅम्प ठिकाणी येऊन या योजनेचा लाभ घ्यावा.

**- वसंत भलभले, वाटप कॅम्प स्वयंसेवक**

## एकही शेतकरी मदतीपासून वंचित ..

शेतकऱ्यांच्या पिकाचा पंचनामा बाकी ठेऊ नका असे आदेश तर एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही असे आश्वासन ना. गुलाबराव पाटील यांनी दिले चोपडा तालुक्यातील धानोरा महसूल मंडळात दि. ६ मे रोजी संध्याकाळी ५ वाजेच्या सुमारास गारा वादळीवारासह जोरदार अवकाळी पाऊस झाला त्यात धानोरा पंचक लोणी, ख १र्डी बिडगाव मोहरद वरगव्हाण पारगाव देवगाव पुनगाव मितावली आदी भागातील केळी पपईच्या बागा जमिन दोस्त झाल्या आहेत सर्वांत जास्त नुकसान धानोरा परिसरात झाले आहे त्याची गंभीर दखल घेवून ना. गुलाबराव पाटील यांनी गुरुवारी आ. प्रा. चंद्रकांत सोनवणे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद जिल्हाकृषी अधिक्षक कुर्बान तडवी प्रांताधिकारी नितिन कुमारजी मुंगटीवार तहसिलदार बाळासाहेब थोरात यांना सोबत घेऊन नुकसानग्रस्त शेतांची पाहणी केली यावेळी कृषी अधिकारी आर.एन. पाटील गटविकास अधिकारी अनिल विसावे मंडळाधिकारी अजय पावरा महसूल अधिकारी राजकं न्या घ्यावट परिसरातील सर्व महसूल अधिकारी शिक्षक सेनेचे चंद्रशेखर साळूंके माजी उपसभापती माणिकचंद महाजन भाजपा तालुका अध्यक्ष चंद्रशेखर पाटील गोकुळ कोळी व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## केसीई महाविद्यालयात परिसर ...

,तांत्रिक माहिती या घटकांद्वारे दुसऱ्या फेरी साठी विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली . मुलाखतीचे आयोजन ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा . मनीष महाले यांनी केले . महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय सुगंधी यांनी निवड झालेल्या विदयार्थ्यांचे कौतुक केले .

## फुटबॉल सुपर कॉर्पोरेट लीगमध्ये...

या सामनामध्ये जैन इरिगेशनने नेव्हल डॉकयार्ड ला नमवित ६-० ने सामना जिंकला. यामध्ये गोल फवाझ अहमद पहिला गोल १४ मिनिटे (पेनल्टी) केला तर त्यानंतर आकाश कांबळे १८ मिनिटे, अरशद शेख २९ मिनिटे, मो. मोईझ ४७ मिनिटे तसेच अभंग अजित जैन यांनी ६८ व ७० मिनिटांत असे दोन गोल केले. त्यांना निखिल माळी यांनी दोघं गोल असिस्ट केलेले आहे. धनंजय धनगर व मिशकात जमाल यांनी उत्कृष्ट कामगिरी या सामन्यात केली. संघ प्रशिक्षक म्हणून अब्दुल मोहसिन काम पाहिले. त्यांना सहाय्यक म्हणून अरबाज खान, सुरज सपके होते. या यशाबद्दल जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन, जैन स्पोर्टस अॅकॅडमीचे अतुल जैन यांच्यासह अरविंद देशपांडे व सहकाऱ्यांनी कौतूक करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## संत सखाराम महाराज रथोत्सव....

यांनी चांदीच्या मशाली धरल्या होत्या. सुरुवातीला परंपरेप्रमाणे मुस्लिम बांधवाकडून मानाची मोगरी लावण्यात आली.भक्तांनी दोराने रथ ओढण्यात आला.नंतर ट्रॅक्टर लावण्यात आले. रथाच्या जवळ पोलीस कर्मचाऱ्यांनी कडे केल्याने सुरक्षा कडक होती. लहान मुले , वृद्ध ,महिलांना सुरळीत दर्शन घेता आले. रथाच्या मागे चांदीचा रथ पादुका असलेला होता. त्यामागे प्रसाद महाराज अनवाणी चालत होते. रथाच्या पुढे वाजंत्री,घोडेस्वार, भालदार चोपदार चालत होते.

रथ मिरवणूकित अनिल जोशी,केतन जोशी,उदय देशपांडे,महेश कोठावदे,निलेश भांडारकर,प्रवीण पाठक,गोपी कासार ,शीतल देशमुख,प्रीतपालसिंग बग्गा, मनोज भांडारकर यांच्यासह अनेक सेवक हजर होते. वाजत गाजत सराफ बाजारातून दगडी दरवाजा मार्गे फरशी रोड मार्गे बोरी नदीच्या पुलावर रथ आल्यानंतर फटाक्यांची आतिषबाजी व रोषणाई करण्यात आली.

## "टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग....

राज्य नाविन्यता सोसासटीचे आयुक्त नितीन पाटील, जलसंपदा विभागाचे सचिव गणेश पाटील, वस्त्रोद्योग विभागाच्या सचिव अंशू सिन्हा, महाराष्ट्र राज्य पोलिस गृहनिर्माण कल्याण सहकारी संस्थेच्या पोलिस महासंचालक अर्चना त्यागी, सामान्य प्रशासन विभागाच्या सहसचिव गीता कुलकर्णी उपस्थित होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशाला विकसित करण्याच्या दृष्टीने स्टार्टअप सारख्या योजना आणल्या आहेत. यात अनेकांनी देशाचे नाव उंचावले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रानेही स्टार्टअप मध्ये देशात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पण शहरांच्या तुलनेत ग्रामीण भागात स्टार्टअपची संख्या कमी असल्याची खंतही मंत्री श्री.लोढा यांनी व्यक्त केली. ग्रामीण भागात स्टार्टअपची संख्या वाढण्यासाठी कौशल्य आणि नावीन्यता विभाग प्रयत्न करत असून मुख्यमंत्री फडणवीस स्वतः यात लक्ष घालत असल्याचे मंत्री श्री.लोढा यांनी यावेळी स्पष्ट केले.

महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीचे कामकाज गतीमान पद्धतीने सुरू आहे याची माहिती देताना अपर मुख्य सचिव मनिषा वर्मा म्हणाल्या. देशात सर्वाधिक स्टार्टअप्स महाराष्ट्रात असून २८ हजार ४०६ स्टर्टअप्सच्या माध्यमातून ३ लाख पेक्षा अधिक रोजगार निर्माण झाले आहेत. यामध्ये १४००० पेक्षा जास्त स्टार्टअप महिला नेतृत्वाखाली आहेत. महाराष्ट्र स्टार्ट अप २०२५ हे नवीन येणारे धोरण, महाराष्ट्र स्टार्टअप विक याबद्दल सविस्तर माहिती दिली.

स्टार्टअप्सना मिळणार शासनाच्या विविध विभागासोबत काम करण्याची संधी यावेळी विविध क्षेत्रातल्या २४ स्टार्टअप धारकांनी आपल्या नाविन्यपूर्ण प्रकल्पांची माहिती दिली. या उपक्रमांतर्गत निवड झालेल्या स्टार्टअप्सना त्यांच्या उत्पादन किंवा सेवेची शासनाच्या विविध विभागांमध्ये प्रायोगिक स्वरूपात अंमलबजावणी करण्यासाठी ज्या विभागासोबत काम करणार आहे त्या विभागासोबत काम करणार आहेत या सर्व स्टार्टअप्सना प्रत्येकी १५ लाखांचा कार्यादेशही दिला जाणार असल्याची माहिती यावेळी अतिरिक्त मुख्य सचिव श्रीमती मनीषा वर्मा यांनी दिली. सहभागी स्टार्टअप्समध्ये हेल्थटेक, एजटेक, ॲग्रीटेक, गव्हटेक, पर्यावरणपूरक तंत्रज्ञान, वाहतूक व्यवस्था यांसारख्या क्षेत्रांतील स्टार्टअप्सचा देखील समावेश होता. मरीन टेक, दिव्यांग,ॲग्रीटेक, दिव्यांगाचे जीवन सुसाह्य करणारी एआय सांकेतिक भाषा, कृषी रोबोटिक्स,प्रगत नॅनो बबल तंत्रज्ञानाद्वारे जल उपचार व शुद्धीकरण प्रक्रियेत सुधारणा, सौर पॅनल्सवर नॅनो कोटिंगद्वारे कार्यक्षमतेत वाढ, एआय प्रणालीद्वारे रस्त्याच्या स्थितीचे रिअल-टाइम विश्लेषण व खड्ड्यांचे शोध, दृष्टीदोष असलेल्या व्यक्तींना सक्षम करण्यासाठी स्मार्ट व्हिजन चष्मे, स्वच्छ ऊर्जा (ऊर्जा कार्यक्षमता वाढवणे), कचरा व्यवस्थापन आणि सर्क्युलर इकॉनॉमी (पर्यावरण जैवतंत्रज्ञान), माती, पाणी व शेती स्वच्छ व सुधारण्यासाठी पर्यावरणपूरक बायोटेक सोल्युशन, जलद जखम भरून काढण्यासाठी न चिकटणारी, शोषणक्षम वॉउंड ड्रेसिंग उत्पादने, तीव्र थंडावा देणारी जॅकेट, सेफ्टी हेल्मेट कुलर, हायपर कूलिंग टॉवेल इत्यादी, -आधारित सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग व डिस्पोजल मशीन, दिव्यांग व्यक्तींना संकेतस्थळावरील कंटेंट सुलभपणे उपलब्ध करून देणारे डिजिटल सोल्युशन, कृषी प्रक्रिया व अॅरोमॅटिक्स, उपग्रह रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानाद्वारे भूस्तरावरील हालचालींमधील धोके ओळखणे, जिओस्पेशियल विश्लेषण, उपग्रह रिमोट सेन्सिंग आणि डेटा ॲनालिटिक्ससाठी, कचरा व्यवस्थापन आणि सर्क्युलर इकॉनॉमी, पर्यावरणपूरक व नैसर्गिक गृह स्वच्छता उपाय, ड्रोन व सर्वेक्षण तंत्रज्ञान आदी क्षेत्रातील संपूर्ण देशभरात उत्कृष्ट असलेले स्टार्टअप्स म्हणून नोंद असलेल्या या स्टार्टअप्सनी आपल्या कामाची माहिती यावेळी दिली.

## विश्वकर्मा गुणवंत कामगार...

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून हे पुरस्कार देऊन गौरवण्यात येते. दरवर्षी एका कामगाराची कामगार भूषण पुरस्कारासाठी तर ५१ कामगारांची विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कारासाठी निवड करण्यात येते, अशी माहिती कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे यांनी दिली आहे.

पुरस्कार्थींची नावे - कामगार भूषण पुरस्कार : श्रीनिवास कोंडिबा कळमकर, मल्टिस्कील ऑपरेटर, बजाज ऑटो लिमिटेड, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर. विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार : १) नेहा विलास भांडारकर, भारतीय आर्युविमा महामंडळ, नागपूर, २) महेश मधुकर सावंत-पटेल, सीमेन्स लिमिटेड,ठाणे-बेलापूर रोड, ठाणे ३) चंद्रकांत महादेव कांबळे, बजाज ऑटो लिमिटेड,वाळूज, छत्रपती संभाजीनगर ४) दादासाहेब सुरेंद्र भंडे, स्कोडा ऑटो फोक्सवॅगन इंडिया प्रा.लि.,छत्रपती संभाजीनगर ५) नरेंद्र शंकर गोखले, राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड, थळ, ता.अलिबाग, जि.रायगड. ६) विजय रामेश्वर बोराडे, हिंदुस्तान युनिलिव्हर लिमिटेड खामगांव, जि.बुलडाणा ७) सचिन लक्ष्मण पिंगळे, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, बुलडाणा ८) संदीप सतीश रांगोळे, टाटा मोटर्स कंपनी लिमिटेड, पिंपरी, पुणे ९) उमेश रामचंद्र फाळके, टाटा मोटर्स कंपनी लिमिटेड, पिंपरी, पुणे १०) राजकुमार गुलाबराव किर्दत, अल्फा लावल इंडिया लिमिटेड,सातारा ११) नामदेव रामसा उईके, सी.आय.ई. ॲटोमोटिव्ह इंडिया कास्टींग लि., उर्सेगांव, ता.मावळ, जि.पुणे १२) निमीषा नितीन मोहरीर, भारतीय जीवन बिमा निगम, नागपूर १३) दिगंबर शंकरराव पोकळे, कमिन्स इंडिया लिमिटेड, कोथरुड, पुणे १४) दत्तात्रय सुखदेव दगडे, स्कोडा ऑटो फोक्सवॅगन इंडिया प्रा.लि., निघोजे म्हाळुंगे खराबवाडी, ता.खेड, चाकण, पुणे १५) संजय जयसिंग देशमुख, थरमॅक्स लिमिटेड, चिंचवड, पुणे १६) विकास चंद्रकांत धुमाळ, महाराष्ट्र स्कुटर्स लि., सातारा लि.आकुर्डी, पुणे १७) बद्रिनाथ शिवनाथ भालगडे, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, सिल्लोड, ता.सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर १८) प्रविण बबन जाधव, गोदरेज ॲण्ड बॉईज, मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लि.,शिंदेवाडी, शिरवळ, ता.खंडाळा, जि.सातारा १९) मनोज अनंत पाटील, टाटा स्टील लिमिटेड, एम.आय.डी.सी., तारापूर, जि.पालघर २०) सुनिता रविंद्र परमणे, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित, पोफळी, ता.चिपळूण, जि. रत्नगिरी २१) प्रकाश बाबुराव चव्हाण, टाटा मोटर्स पॅसेंजर्स व्हेईकल्स लिमिटेड चिखली, पुणे २२) शिवराज दादासो शिंदे, प्रिमियम ट्रांन्समिशन प्रा.लिमिटेड,चिंचवड, पुणे २३) कविता नरेश भोसले, मुंबई पोर्ट ट्रस्ट, मुंबई पोर्ट ट्रस्ट रुग्णालय, वडाळा (पूर्व), मुंबई २४) मनोज देविदास गवळी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, धुळे २५) रविंद्र बाबाजी जाधव, विचारे एक्सप्रेस ॲण्ड लॉजिस्टीक प्रा.लि., कांदिवली (प), मुंबई २६) मारोती सदाशिव पिंपळशेंडे, चंद्रपुर महाऔष्णिक विद्युत निर्मिती केंद्र, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित,ऊर्जानगर २७) साखरचंद मारुती लोखंडे, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे २८) देविदास पंडीत पवार, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, धुळे २९) किसन दामोधर नागरकर,महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित बल्लारशाह ३०) रविंद्र किसनराव रायकर, कमिन्स इंडिया लिमिटेड, कोथरुड, पुणे ३१) वंदना अशोक मनपे, चंद्रपुर महाऔष्णिक विद्युत निर्मिती केंद्र, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित, ऊर्जानगर, चंद्रपुर ३२) विवेक सर्जेराव रावते, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, इस्लामपुर,ता.वाळवा, जि.सांगली ३३) देवकी ओमप्रकाश कोकास, बिल्ट पेपर ग्राफिक्स प्रॉडक्ट लिमिटेड, बल्लारपूर, पेपर मिल्स, चंद्रपूर ३४) एकनाथ रमेश उगले, थरमॅक्स लिमिटेड, चिंचवड, पुणे ३५) राजेंद्र ज्ञानदेव कांबळे, दि कराड को-ऑप.बँक लिमिटेड, कराड ३६) संजय दगु गोराडे, किमप्लास पाईपिंग सिस्टीम प्रा.लिमिटेड,अंबड, नाशिक ३७) नितीन आनंदराव देडगे, वनाझ इंजिनिअर्स लिमिटेड, कोथरुड, पुणे ३८) सुनिल गुंडू दळवी, विभाग नियंत्रक यांचे कार्यालय मध्यवर्ती बसस्थानक, कोल्हापूर ३९) पोपट चंदु रसाळ, स्टरलाईट टेक्नॉलॉजी, छत्रपती संभाजीनगर ४०) अजित अनंत कामतेकर, राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड.

# आज हभप इंदुरीकर महाराज यांचे समाज प्रबोधन जाहीर कीर्तन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुक्ताईनगर** प्रतिनिधी

श्रीमंत संत मुक्ताई वारकरी शिक्षण संस्था, आळंदी देवाची दरवर्षीप्रमाणे बाल वारकरी सुसंस्कार शिबिर भरवीत असते. या शिबिराचा प्रारंभ दिनांक १ मे गुरुवार रोजी झाला आणि या भव्य बाल वारकरी सुसंस्कार शिबिराची सांगता आज १० मे शनिवार रोजी होत आहे. यंदाचे बाल सुसंस्कार शिबिराचे पाचवे वर्ष आहे. आज या शिबिराची सांगता असल्याने त्यानिमित्ताने ह भ प निवृत्ती महाराज इंदुरीकर यांचे जाहीर कीर्तन व समाज प्रबोधनाचा कार्यक्रम शनिवारी सायंकाळी ०६:०० ते रात्री ०९:०० या वेळेत मुक्ताईनगर शहरातील बोदवड रोडवरील नवीन मुक्ताई मंदिराजवळ होणार आहे.

या कीर्तनाच्या कार्यक्रमाला मुक्ताईनगर तालुका व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन ह भ प स्वप्निल महाराज आळंदीकर व ह भ प कृष्णा महाराज आळंदीकर यांनी केले आहे.

# शहीद जवान राकेश शिंदे यांच्या मातेस मांडवेदिगर येथे २ हेक्टर शेतीयोग्य जमीन प्रदान

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

जम्मू-काश्मीरमधील ऑपरेशन रक्षक (दि. २७ फेब्रुवारी २०००) दरम्यान शौर्याने लढताना वीरमरण आलेले जवान राकेश काशिराम शिंदे (रा. कुर्हे पानाचे, ता. भुसावळ) यांच्या मातोश्री अनुसयाबाई काशिनाथ शिंदे यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने मांडवेदिगर (ता. भुसावळ) येथे २ हेक्टर शेतीयोग्य कृषिक जमीन प्रदान करण्यात आली.

या भावनिक आणि प्रेरणादायी प्रसंगी आयोजित कार्यक्रमात जिल्ह्याचे पालकमंत्री मा. गुलाबराव पाटील व केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री श्रीमती



रक्षा खडसे यांच्या हस्ते जमिनीचा अधिकृत प्रदान आदेश सुपूर्द करण्यात आला. यावेळी खासदार स्मिता वाघ, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्यासह प्रशासनाचे विविध अधिकारी उपस्थित होते.

या वेळी बोलताना पालकमंत्री पाटील म्हणाले, "शहीद जवानाच्या मातेस दिलेला हा सन्मान केवळ आर्थिक मदत नसून, त्यांच्या देशसेवेच्या त्यागाची शासनाकडून दिली गेलेली कृतज्ञतेची नम्र भावांजली आहे." कार्यक्रमात भावना व्यक्त करताना वीरमाता अनुसयाबाई शिंदे म्हणाल्या, "मुलगा देशासाठी गेला, पण शासनाने त्याच्या बलिदानाची दखल घेतली, याचा अभिमान वाटतो. ही जमीन आम्हाला त्याच्या आठवणी जपण्यासाठी नवसंजीवनी देईल."

कार्यक्रमास तालुका प्रशासनाचे अधिकारी, ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते तसेच शहीद जवानांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कॅनरा बँकेचे कोरडें व झाडेंची बदली



**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चोपडा** प्रतिनिधी

चोपडा शहरातील कॅनरा बँकेचे मॅनेजर संजय कोरडे यांची प्रशासकीय बदली झाली असून त्यांनी तीन वर्षे चोपडा येथे शाखा व्यवस्थापक म्हणून उत्कृष्ट काम केले असून एक मनमिळाऊ सर्वाना मदत करणार व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांनी सर्वांच्या मनात घर केले होतें.व ट्रान्सपर अधिकारी सुधीर झाडे यांची चंद्रपूर येथे बदली झाली.

त्यांच्या बदली निमित्ताने शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांनी निरोप दिला शाल पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. त्यावेळी जीतेश बारगावणे,चंद्रकांत सूर्यवंशी, प्रमोद पाटील,साहेबराव पाटील,कपिल कोळी यांच्यासह पत्रकार व सामाजिक न्याय विभागाचे शहर अध्यक्ष मिलिंद सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते किरण करंदीकर ग्राहक योगेंश सोनवणे हजर होते. नवे शाखा व्यवस्थापक राहुल कुमार संजय कोरडेंच्या जागेवर हजर झाले आहेत.

# खरिपाच्या तोंडावर आर्थिक विवंचनेत शेतकरी पुत्राची आत्महत्या

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**सोयगाव** प्रतिनिधी

गत वर्षीच्या खरीप हंगामासाठी घेतलेले पेरणी साठी काढलेले खासगी व राष्ट्रीयकृत बँकेचे कर्ज न फेडल्या गेल्याने व आगामी खरीप हंगामात पेरणीची चिंता असलेल्या शेतकरी पुत्राने घरातच झोक्याच्या दोरीने गळफास घेऊन आर्थिक विवंचनेत आत्महत्या केल्याची घटना सोयगावच्या आमखेड्यात गुरुवारी दुपारी दोन वाजून तीस मिनिटांनी घडली. दीपक अर्जुन नागपुरे( वय ३५ ) रा.शिवाजीनगर आमखेडा (सोयगाव) असे मृत झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे घरातील झोकाच्या दोरीला गळफास घेत या शेतकरी पुत्राने कर्जाच्या विवंचनेत जीवन संपविले आहे परिसरातील नागरिकांच्या लक्षात हा प्रकार येताच तातडीने त्यास सोयगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता, वैद्यकीय अधिक्षक डॉ दिनाजी खंदारे यांनी तपासून मृत घोषित केले दरम्यान या शेतकरी पुत्रकडे वडिलांच्या नावे एकर भर शेती आहे हाती आलेल्या शेतमालाला योग्य दर न मिळाल्याने त्यांचे कर्ज फिटले नव्हते त्यांच्या कडे असलेले खासगी व बँकांचे



कर्जाची दोन लक्ष पन्नास हजार रु फेडण्याच्या विवंचनेत या शेतकरी पुत्राने गळफास घेवून आत्महत्या केली आहे याप्रकरणी महसूल विभागाने घटनेचा पंचनामा केला असून महसूलच्या पंचनाम्यात शेतकरी पुत्राने कर्जाच्या आर्थिक विवंचनेत गळफास घेतल्याचे नमूद करण्यात आले आहे सोयगाव पोलिसांनी घटनेची नोंद घेतली आहे या घटनेमुळे सोयगाव व आमखेड्यातील शिवाजी नगर भागात हळहळ व्यक्त होत आहे त्याच्या पश्चयात आई,वडील, पत्नी,एक भाऊ, एक बहीण एक मुलगा एक मुलगी असा परिवार आहे.

# अपहार - मुक्ताईनगर नगरपंचायत : बनावट पावती पुस्तकांतून नागरिकांची आर्थिक लूट

## नगरपंचायतिच्या दोन कर्मचाऱ्यांना नोटिसा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुक्ताईनगर** प्रतिनिधी

घरपट्टी व पाणीपट्टीची बनावट बिल बुके छापून मुक्ताईनगर नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्या द्वारा झालेल्या लाखोंच्या भ्रष्टाचाराची चौकशी होऊन तात्काळ कारवाई करावी अशा मागणीची तक्रार शिवसेना शहर प्रमुख प्रशांत टोंगे यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, मुक्ताईनगर नगरपंचायतीतर्फे शहरातील नागरिकांकडून घर पट्टी व पाणी पट्टी वसुलीच्या माध्यमातून नफा फंडातून कार्यालयीन कामकाज तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर महत्वपूर्ण खर्च भागवला जातो. परंतु येथे एक धक्कादायक प्रकार उघडकीस आलेला असून कुंपणच शेत खातंय अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. नगरपंचायत कारभार प्रशासक काळात गेल्यापासून येथे कर्मचारी मनमानी व भ्रष्टाचारी कारभार वाढलेला असून सदरील पालिकेत सुरवातीपासून प्रभारी मुख्याधिकारी पदाचा कार्यभार असल्याने याचा फायदा उचलत नगरपंचायत कर विभागातील कर्मचारी यांनी घरपट्टी व पाणीपट्टीची बनावट बिल बुके छापून नागरिकांना करापोटी बनावट पावत्या देवून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केल्याची शक्यता आहे. दरम्यान अनेक नागरिकांनी सदरील पालिकेत कर भरणा केल्यावरही त्यांच्या खात्यावर थकबाकी त्याच स्वरूपात दिसून येत असल्याने यासंदर्भात नागरिकांनी शिवसेनेचे प्रशांत टोंगे यांच्याकडे तक्रारी केलेल्या आहेत.

दरम्यान दोन बिल बुकात दोन कर्मचाऱ्यांनी सुमारे दीड लाख रुपयांच्या जवळपास अपहार केल्याचे प्रथम दर्शनी दिसून येतात त्या दोघ कर्मचाऱ्यां ना मुख्याधिकाऱ्यां तर्फे नोटीसा बजावण्यात आल्या असून तीन दिवसाच्या आत वसूल करण्यात आलेल्या रकमांची भरपाई करावी अशा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत अशी माहिती प्रभारी मुख्याधिकारी भूषण वर्मा यांनी दिली आहे.

# माजी आमदार कैलास पाटील आणि दिलीप सोनवणे राष्ट्रवादीत

## चोपड्यात भव्य सत्कार सोहळा



**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चोपडा** प्रतिनिधी

सद्ध्या जळगाव जिल्हयातील २माजी मंत्री व तीन माजी आमदारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत प्रवेश केल्याने अजितदादा गटात आनंदाचे वातावरण असून चोपडा तालुक्यात ही माजी आमदार कैलास बापू पाटील व माजी शिक्षक आमदार दिलीपराव सोनवणे यांनी मुंबई येथे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश केला.

ना.अजितदादा पवार यांचे नेतृत्व हे सर्व महाराष्ट्राला मान्य असून त्यांची कामाची पद्धत ही सडेतोड असून काम करणारे नेतृत्व सर्वांनी स्वीकारले आहे.ना अजितदादा व माझे समंध अतिशय जिव्हाळ्याचे आहेत.मी आमदार असतांना मला दादांनी खूप मदत केली निधीची कमी नाही पडू दिली.दादांकडे महाराष्ट्र चालविण्याचे व्हिजन असून स्पष्टवक्तेपणा हा स्वभाव सर्वांना आवडतो.यापुढे तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वाढवण्यासाठी मी सदैव काम करेल असे सत्काराला उत्तर देतांना कैलास पाटील म्हणाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पहलगाम हल्ल्यात निष्पाप बळी पडलेल्या भारतीयांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

चोपडा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने तालुकाध्यक्ष (विजय) बाळासाहेब पाटील व शहर अध्यक्ष गिरीश देशमुख यांनी सत्कार समारंभ आयोजीत केला होता.त्यावेळी व्यासपीठावर माजी जिल्हाध्यक्ष अमृतराज सचदेव, चोपडा कसबेचे चेअरमन प्रवीणभाई गुजराथी,जिल्हाउपाध्यक्ष परेश देशमुख कृषिभूषण हिरालाल पाटील,माजी झेड पी सदस्य सुनील पाटील,यांची उपस्थिती होती.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत पक्षप्रवेश केलेले जेष्ठ नेते तुकाराम पाटील,नौमान काजी यांचा ही सत्कार करण्यात आला.माजी आमदार दिलीपराव सोनवणे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नारायण पाटील,तालुकाध्यक्ष बाळासाहेब पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी रमाकांत बोरसे,रामचंद्र भादले,सुनील पाटील (सभापती) निलेश पाटील, महिला पदाधिकारी स्वाती बडगुजर,सविता पाटील,माया महाजन,यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सामाजिक न्याय विभागाचे शहर अध्यक्ष मिलिंद देवराम सोनवणे यांनी केले.

## तहसिल कार्यालय जामनेर जि.जळगाव

दुरध्वनी क्र.०२५८०-२३००३४ ई-मेलः-Tah.jamner@gmail.com

क्र.जमाबंदी-२/कावि/९०४/२०२४ दिनांक - २९/०४/२०२५

### -: जाहीर प्रकटन :-

ज्याअर्थी ,**श्री रमेश कृष्णा जोशी रा.वाकोद** ता. जामनेर जि. जळगाव यांची **मौजे वाकी खुर्द गट नं. २८/२/१ मधील प्लॉट नं. ९ च्या ७/१२ वर आजरोजी नमूद सुरेश गोपाल जंजाळकर यांचे नाव कमी करणेकामी अर्ज प्राप्त झालेला आहे.**त्याअर्थी, सदर अर्जानुसार **मौजे वाकी खुर्द गट नं. २८/२/१ मधील प्लॉट नं. ९ च्या ७/१२ वर आजरोजी नमूद सुरेश गोपाल जंजाळकर यांचे नाव कमी करणेकामी** कोणाचा काही आक्षेप अथवा हरकत असल्यास त्यांनी तहसिल कार्यालय, जामनेर जि. जळगाव येथे **दिनांक १७/०५/२०२५ पावेतो लेखी** स्वरुपात हरकत दाखल करावी. अन्यथा तद्नंतर प्राप्त तक्रारीचा विचार न करता पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल. या करीता हे जाहीर प्रकटन केले असे.

**सही/-**
**नानासाहेब आगळे**
**तहसीलदार जामनेर**

## प्रतिज्ञापत्र

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो.**
**भुसावळ / बोदवड यांचे कोर्टात**
**तारीख /०२/२०२५**

**विषय - मयताचे मिळकतीस वारसांची नावे दाखल करणेबाबत**
**लिहुन देणार :- रघुनाथ सांडू नगरे , उ. व. ५९ वर्षे धंदा - मजुरी**
**रा. लोहार गल्ली,वरणगाव ता. भुसावळ जि. जळगाव**

कारणे सत्य प्रतिज्ञापत्र लिहून देतो / देते की,मी मौजे लोहार गल्ली ता. भुसावळ जि. जळगाव येथील कायम व मुळ रहिवासी आहे. **माझी आई नामे सुमनबाई सांडू नगरे हे वरणगांव येथे दि. १५/०४/२०१६ रोजी मयत झालेले आहेत.** त्यांचे मृत्यूपश्चात वारस पती मयत, मुले ३, मुली २ असे खालीलप्रमाणे वारस आहेत.

वारसांची नावे येणेप्रमाणे

| अ.नं. | वारसांची नावे | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | रघुनाथ सांडू नगरे | ५९ | मुलगा |
| २ | गणेश सांडू नगरे | ५१ | मुलगा |
| ३ | अशोक सांडू नगरे | ४४ | मुलगा |
| ४ | सुनिता कैलास लोहार | ७४ | मुलगी |
| ५ | रेखा राजेंद्र चव्हाण | ५६ | मुलगी |

येणेप्रमाणे मयतास वारस असून वरील वारसांचे व्यतिरिक्त मयतास इतर अन्य कोणीही वारस नाहीत. मयताचे उपरोक्त वारस हे कायदेशिर व खरे वारस आहेत. सदर बाबत कोणताही खोटेपणा नाही. **मयताचे पती नामे सांडू रामचंद्र नगरे हे दि. ०६/११/१९८१ रोजी मयत असून त्यांचे मृत्यूपश्चात वर प्रमाणेच वारस आहे. मयताचे नावे मौजे वरणगांव येथील सि.स.नं. २९७७ यांसी नविन नगरपरिषद मालमत्ता क्रमांक १/६६९ व १/६७० व जुना नगरपरिषद मालमत्ता क्रमांक ११३६ ही / हया मिळकत / मिळकतीत हिस्सा असून सदर मिळकतीस / मिळकतीतील मयताचे हिश्यास** मयताचे वर प्रमाणे वारसांची नोंद मा. मख्युाधिकारी, नगरपरिषद वरणगांव यांनी करणेकामी मी हे सत्य प्रतिज्ञापत्र लिहून दिलेले आहे. उपरोक्त मजकुर अगदी बरोबर व खरा असून त्यात कोणताही खोटेपणा नाही. तसा कोणताही खोटेपणा निघाल्यास त्यास मी भारतीय न्यायसंहिता २०२३ या कायद्याच्या कलम २३६, २३७ नुसार गुन्हयास पात्र राहील याची मला जाणीव आहे व कलम २२९ [२] नुसार शिक्षेस व दंडास जबाबदार राहील. सदर मजकुराचे खरेपणाकरीता मी कार्यकारी दंडाधिकारी / मे नोटरी पब्लीक भुसावळ यांचे समक्ष सही केलेली आहे.

**प्रतिज्ञापत्र करुन देणाराची सही**

लोकशाही

संपादकीय




# ऑपरेशन सिंदूरने घेतला पहैलगाम हल्ल्याचा बदला

जम्मू-काश्मीरमध्ये पहैलगाम येथे पाकिस्थानी अतिरेक्यांनी पाकच्या सहकार्याने भारतीय पर्यटकांवर हल्ला करून २७ पर्यटकांना ठार केले. निरपराध भारतीय पर्यटकांच्या मृत्यू मुळे भारतात सर्वत्र हळहळ व्यक्त होऊ लागली. भारतीय नागरिक असवस्थ बनले पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भाजप सरकारला जणू पाकिस्थानने आव्हानच दिले होते. परंतु साळसूदपणे आमचा या पेहलगाम हल्ल्याशी सुतराम संबंध नाही म्हणून पाक सरकारने हातवर केले होते. परंतु या अतिरेकी हल्ल्या मागे पाकिस्थांचा पूर्णपणे हात होतो हे सांगण्यासाठी कुण्या ज्योतिषाची गरज नव्हती. भारताने तातळीने पहैलगामच्या पर्यटकांवर हल्ला करणार्या सात अतेरिक्यांच्या घरावर हल्ला करुन त्याचां खातमा तर केलाच परंतू पाकिस्थानी अतिरेक्यांचे समुळ नष्ट करण्यासाठी भारताने व्हयूव रचना आखली पहैलगाम हल्याचे वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रेदेशात असताना प्रदेश दौरा अरधवट सोडून भारतात परतले आणि पहैलगाम हल्लाचा बदला घेण्याचे धोरण सुरु केले. तीन्ही सैन्यदलाच्या प्रमूखाची बैठक घेऊन त्यांना बदला घेण्यासाठी पुर्ण मुभा देण्यात आली. त्याचाच एक भाग म्हणजे पाकिस्थानच्या अतिरेकी केंद्रावर हवाई अट्याक करण्यात आला. या हावाई हल्लाला ऑपरेशन सिंदूर असे नाव खुद्द पंतप्रधानांनी सुचविले ऑपरेशन सिंदूरची कार्यवाही पूर्णपणे यशस्वी झाली. ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्थानातील अतिरेक्यांच्या प्रशिक्षण केंद्रावर हल्ला करून अशी नऊ प्रशिक्षण केंद्रे उध्वस्त करण्यात आली. त्यात जैशेच्या अतिरेक्यांचे प्रशिक्षण केंद्राचा सुध्दा समावेश आहे. जैशेचे शंभर अतिरेकी सैनिक यात ठार झाले. लष्करे तोयबाच्या प्रामुख्याचे घर सुध्दा उध्वस्थ केले. त्यात त्याचे कुटुंब हि भस्म झाले. दोनशे एकर परिसरात लष्करे तोयबाचे असलेल्या प्रशिक्षण केंद्रात २६/११ च्या मुंबई हल्ल्यातील अतिरेकी अजमल कसाब याने यात केंद्रात अतिरेक्यांचे प्रशिक्षण घेतले होते. याचाच अर्थ पाकिस्थान सरकारने पोहचलेल्या अतिरेक्यांचे भारतीय सैनिकांनी ऑपरेशन सिंदूरमध्ये कंबरडे मोडले आहे. भारतीय सैनिक तसेच विशेषतः हवाई दलाने केलेल्या ऑपरेशन सिंदूरबद्दल आम्हा सर्व भारतीयांना सार्थ अभिमान आहे. ऑपरेशन सिंदूर हे कृती कौतुकास पात्र आहे. जगातील एकटे चीन सोडले तर अमेरिका, रशिया, इस्त्राईल आदी विविध देशांकडून भारताने उचलेल्या अतिरेक्यांच्या उद्धवस्थते बाबत ऑपरेशन सिंदूरचे समर्थन केले आहे.

ऑपरेशन सिंदूरसारख्या मोठ्या कार्यवाही नंतर पाकिस्थान हादरले असून त्याच्या आता कुरापत्या सुरु झाल्या आहे. पाकतर्फे सैनिकांनी गोळीबार करून ७ भारतीय नागरिकांना ठार केले आहे. एवढेच नव्हे तर ऑपरेशन सिंदूरच्या कारवाई नंतर पाकिस्थांचे पंतप्रधान शाहबाग यांच्या निवास्थानी सुरक्षा समितीची बैठक घेऊन भारताच्या विरुद्ध युद्ध करण्याचे सूतोवाच करण्यात आले. यदा कदाचित युद्ध झालेच तर पाकिस्थांचे फार मोठे नुकसान होण्याची भीती खुद्द पाकिस्थानी नागरिक व्यक्त करीत आहे. परंतु कुत्र्याचे शेपूट वाकडेते वाकडेच असे म्हणतात ताशयातला प्रकार पाकिस्थांचा म्हटला पाहिजे १९५७ साली करण्यात आलेल्या सिंधू जलकराराचे रद्द करून तो करार भारताने संपुष्ठात आणण्याचा निर्णय भारताने घेतला आहे. भारताच्या सिंधू जलकरार बंद च्या निर्णयाने पाकिस्थानात एकच खळबळ उडाली आहे. तिचेच पाकिस्थानातील भारतात असलेल्या रहिवास्यांना ४८ तासाच्या आत भारत सोडण्याचा निर्वाणीचा इशारा दिला आहे. तसेच पाकिस्थानातील भारतीय रहिवास्यांना तातडीने पाक सोडून भारत यावे अशा सूचना देण्यात आला आहे. भारतात असलेले पाकिस्तानी राजदूत कार्यालय तातडीने हलवाव्यात अशा सूचना देण्यात आल्या आहे. त्या नंतर अटारी बॉर्डर जेथून पाकिस्थानी व भारतीय येजा करतात हे टारी बॉर्डर बंद कार्यांत आले आहे. हे सर्व भारताने कार्यवाही केल्यामुळे पाकिस्थांची फार मोठी कोंडी झालेली आहे. त्यातच ऑपरेशन सिंदूर या हवाई कार्यवाही मुळे पाकिस्थान हतबल झाले सून आता ते भारत विरुद्ध कुरापती करण्यास सुरुवात केली आहे.

# महाराणा प्रतापसिंह यांच्या ४८५व्या जयंतीनिमित्त अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने प्रतिमापूजन

**चाळीसगाव शासकीय विश्रामगृहात उत्साहात कार्यक्रम; महाराणांच्या शौर्याला अभिवादन करत जयघोष**

लोकशाही न्यूज नेटवर्क
चाळीसगाव प्रतिनिधी

क्षत्रिय कुलावतंस शूरवीर महाराणा प्रतापसिंह यांच्या ४८५व्या जयंतीनिमित्त अखिल भारतीय मराठा महासंघाच्यावतीने ९ मे २०२५ रोजी सकाळी ११ वाजता चाळीसगाव येथील शासकीय विश्रामगृहात प्रतिमापूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



या कार्यक्रमात अखिल भारतीय मराठा महासंघाच्या जिल्हाध्यक्ष अनिता शिंदे यांच्या हस्ते महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. नंतर उपस्थित पदाधिकाऱ्यांनीही प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या शौर्याला नम्र अभिवादन केले. जय महाराणा प्रताप! च्या घोषणांनी संपूर्ण वातावरण देशभक्तीमय झाले.

कार्यक्रमात शहराध्यक्ष नंदकिशोर पाटील यांनी महाराणा प्रतापसिंह यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांचे आत्मसन्मानाचे आणि स्वतंत्रतेचे मूल्य समाजासमोर मांडले.

याप्रसंगी जिल्हा संपर्कप्रमुख खुशाल बिडे, महिला जिल्हाध्यक्ष अनिता शिंदे, जिल्हा कोषाध्यक्ष अशोक भोसले, शहर उपाध्यक्ष कैलास पाटील, तालुका उपाध्यक्ष अमोल पाटील, तालुका संघटक शेखर पाटील, तसेच सामाजिक कार्यकर्ते सचिन गुंजाळ, साहिल कोल्हे यांच्यासह मराठा समाजाचे अनेक बांधव उपस्थित होते.

**प्रेरणादायी संघर्षाचे प्रतीक महाराणा प्रताप**

स्वाभिमान, शौर्य आणि मातृभूमीवरील प्रेम यांचे जाज्वल्य उदाहरण म्हणजे महाराणा प्रतापसिंह. अकबरासारख्या बलाढ्य सम्राटासमोरही न झुकता त्यांनी मेवाडच्या स्वातंत्र्यासाठी अखेरपर्यंत संघर्ष केला. त्यांच्या जीवनातून आजच्या पिढीला आत्मसन्मानाने जगण्याची प्रेरणा मिळते.

**महसूल विभागाचा सतत कारवाई मुळे रेती चोरटे बिळात**

# व्हाईट कॉलरचे आड रेती वाहतूक करणार्याविरूध्द कारवाई

लोकशाही न्यूज नेटवर्क
चंद्रपूर प्रतिनिधी

तालुक्यातील चोरट्या मार्गाने विनापरवाना रेती उत्खनन करून वाहतूक करणार्याविरूध्द तहसीलदार राजेश भांडारकर यांनी रेती चोरट्यांवर धडक मोहीम राबविली असून कारवाई चा बडगा सुरुच आहेत.

मात्र रेती चोरटे एका विशिष्ट पक्षाचे मुख्य पदाधिकारी असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येत आहेत हे पदाधिकारी रेती उत्खनन करीत आहेत. अशा रेती माफियांनवर अंकुश लावण्यात कर्तव्यदक्ष तहसीलदार राजेश भांडारकर यांचा नेतृत्वात भरारी



पथकांनी तालुक्यातील अवैध रीत्या रेतीसह मालवाहतूक करणार्या दोन पिकअप गाडी (चार चाकी वाहन) तसेच ट्रॅक्टर ताब्यात घेत कारवाई करीत ताब्यात घेण्यात मोठे यश महसूल विभागाला आले.

दरम्यान ताब्यात घेतलेल्या वाहणांचा मालक चालकाविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश तहसीलदार भांडारकर यांनी दिले असून विनापरवाना रेती वाहतूक करणार्या वाहणांवर सतत कारवाई होत असल्याने सफेद पोशाखातील रेती चोरट्यांचे धाबे दणाणून गेल्यामुळे बिळात गेले असल्याची माहीती सूत्रानुसार प्राप्त झाली

सदर कारवाई तहसीलदार राजेश भांडारकर यांचा प्रभावी मार्गदर्शनात ग्राम महसूल अधिकारी राहुल भोंगडे यांचा नेतृत्वात बंडू वेलफूलवार, निर्दोष फुलभोगे यांनी बरांज गावा नजिक वॉईट कॉलर चा आळ रेती चोरट्यांवर कारवाई केली तर मांगली रोड येथील ग्राम महसूल अधिकारी अनिल शृंगारे यांचे नेतृत्वात मंडळ अधिकार अनिल दडमल यांचा पथकाने केली.

# आमदारांच्या हस्ते कामगारांना साहित्य वाटप

लोकशाही न्यूज नेटवर्क
चंद्रपूर प्रतिनिधी

वरोरा शहर व तालुक्यातील पात्र बांधकाम कामगारांसाठी स्वयंपाक साहित्य वाटप शिबिराचे आयोजन वरोरा येथील मोहबाळा रोडवरील राजीव गांधी कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये आमदार करण देवतळे यांच्या हस्ते नुकतेच पार पडले.

यावेळी शेकडो महिलावर्ग पुरूष कामगार सहभागी होते. लाभार्थ्यांना स्वयंपाक साहित्य वाटप करण्यात आले.

दरम्यान मागील काही महिण्यापुर्वी हजारो बांधकाम महिला कामगारांना खासगी संस्थांच्या ठिकाणी स्वयंपाक साहित्यसहीत पेट्याचे वितरण




करण्यात येणार अशी माहीती सुद्धा काही महिन्यापूर्वी देण्यात आली असता साहित्य काही आले नाही त्यामुळे गोंधळ निर्माण झाला होता.

तसेच शेकडो कामगारांनी आमदार करण देवतळे यांची भेट घेऊन तालुका स्तरावरील साहित्य वाटप करण्याची मागणी केली होती. तात्काळ आमदार देवतळे यांनी संबंधित अधिकाऱ्याला कामगरांना तालुका स्तरावर साहित्य वितरण करण्याचे आदेश दिले.

सदर कामगार साहित्य वाटप करण्यात येणार आहे. ह्याकरिता कामगार आयुक्त तसेच संस्थेच्या वतीने कुपन काढून पेट्याचे वितरण करण्यात आले असतांना सोबतच अल्पपोहार देऊन कार्यक्रमची सांगता करण्यात आली. सदर पात्र साहित्य वाटप उपक्रमाला भाजप चे जेष्ठ पदाधिकारीसह कार्यकर्ते हजर होते. विशेष म्हणजे आमदार देवतळे यांचे स्वीय सहाय्यक प्रणय यांनी विशेष परिश्रम घेऊन महत्त्वाचे कार्य केले.

**तांबेपुरातून अल्पवयीन मुलीला कारमधून पळवले**

**अमळनेर :** अल्पवयीन मुलीला कारमधून पळवून नेल्याची घटना ६ रोजी दुपारी १२.४५ वाजेच्या सुमारास तांबेपुरा भागातील रेल्वे पुलाजवळ घडली. शहरातील एका भागातील राहणारी १७वर्षे ७ महिने वयाची मुलगी आपल्या बहिणीसोबत महादेव मंदिराजवळून लग्नात जेवायला गेली होती. दुपारी १२.४५ वाजता धरगाव येथील शुभम किशोर पारधी हा लाल रंगांच्या कारमधून आला आणि तो या मुलीला पळवून घेऊन गेला. या प्रकरणी मुलीच्या वडिलांनी अमळनेर पोलीस ठाण्यात धाव घेत फिर्याद दिल्यावरून शुभम पारधी याच्याविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक राजू जाधव करत आहेत.

# मुक्ताईनगर नगरपंचायतीत बनावट बिलांद्वारे लाखोंचा भ्रष्टाचार?

**शिवसेनेच्या शहरप्रमुखांची चौकशीची मागणी**

लोकशाही न्यूज नेटवर्क
मुक्ताईनगर प्रतिनिधी

मुक्ताईनगर नगरपंचायतीत घरपट्टी व पाणीपट्टी वसुलीच्या नावाखाली लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकाराची सखोल चौकशी करून संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शिवसेनेचे शहरप्रमुख प्रशांत टोंगे यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे.

शहरातील नागरिकांकडून घरपट्टी व पाणीपट्टीच्या माध्यमातून मिळणारा महसूल हा नगरपंचायतीच्या नफा फंडात जमा होतो. याच माध्यमातून कार्यालयीन खर्च, कर्मचाऱ्यांचे



वेतन आणि इतर महत्वाचे आर्थिक व्यवहार पूर्ण केले जातात. मात्र नगरपंचायतीच्या कर विभागातील काही कर्मचाऱ्यांनी संगनमत करून नागरिकांना बनावट बिल बुके आणि पावत्या देवून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केल्याचे उघड झाले आहे. ही घटना ''कुंपणच शेत खातंय'' अशी म्हण खरी ठरवणारी असून, प्रभारी मुख्याधिकाऱ्यांच्या कार्यकाळात अशा प्रकारचे गैरप्रकार बळावत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. नागरिकांनी कर भरल्यावरही त्यांच्या खात्यावर थकबाकी दाखवली जात असल्याचे प्रकार वाढले असून, अशा अनेक तक्रारी शिवसेना शहरप्रमुख प्रशांत टोंगे यांच्याकडे प्राप्त झाल्या आहेत. प्रशांत टोंगे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ''माझ्याकडे आलेल्या तक्रारींनुसार नगरपंचायतीच्या कर विभागातील काही कर्मचाऱ्यांनी बनावट पावत्यांच्या आधारे लाखोंचा अपहार केला आहे. याप्रकरणी तात्काळ सखोल चौकशी करून जबाबदार कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी.

# धानोरा ज्युनिअर कॉलेजचा ८६ टक्के निकाल



लोकशाही न्यूज नेटवर्क
धानोरा ता. चोपडा प्रतिनिधी

येथील नामदेवराव भाऊसिंग पाटील ज्युनिअर कॉलेज धानोरा या विद्यालयाचा नुकत्याच ऑनलाइन जाहीर झालेल्या निकालानुसार इयत्ता बारावीचा एकूण निकाल ८६.२७% लागला आहे. विद्यालयाची यशाची परंपरा कायम राखत यावर्षी सुद्धा सदर निकालामध्ये मुलींनीच बाजी मारली आहे यात कु नंदिनी विश्वनाथ नाडे हिने ६९.८३% मिळवत प्रथम क्रमांक पटकावला तर द्वितीय क्रमांक कु.तडवी सानिया मुकेश हिने ६३.५०% टक्के मिळवून प्राप्त केला तसेच विद्यालयातून तृतीय क्रमांकाने कु. तडवी नफीसा हबीब ६३.१७ % मिळवून उत्तीर्ण झाली या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे चेअरमन प्रदीप विष्णू महाजन, शालेय समिती सदस्य बी.एस. महाजन सर, वामनराव भावडू महाजन, योगेश चुडामन पाटील, सागर चौधरी,व्ही.सी.पाटील सर,अनिल महाजन,विद्यालयाचे प्राचार्य के.एन.जमादार, उपमुख्याध्यापक प्रभारी पर्यवेक्षक एल.डी.पाटील या सर्वांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले.

यावेळेस शाळेत इयत्ता बारावीतील यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी शालेय समितीचे ज्येष्ठ सदस्य वामनराव भावडू महाजन तसेच योगेश चुडामन पाटील विद्यालयाचे प्राचार्य के. एन. जमादार सर हे उपस्थित होते. प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींना पेढे भरवून आणि पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.सर्व यशस्वी विद्यार्थिनींना पुढील उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळेस यशस्वी विद्यार्थ्यांचे आई-वडील, तसेच प्रा. संजय बडगुजर, शांताराम पाटील, प्रा. मिलिंद बडगुजर, प्रा.श्रीमती रेखा महाजन, लिपिक भूपेंद्र परमार,पंकज महाजन, देविदास साळुंके आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शांताराम पाटील यांनी केले तर आभार प्रा. मिलिंद बडगुजर यांनी केले.

# यावल तहसीलदारांचा अवैध वाळू वाहतुकीवर सर्जिकल स्ट्राइक

**पाठलागात शासकीय वाहन नदीपात्रात उलटले, सुदैवाने जीवितहानी नाही**

लोकशाही न्यूज नेटवर्क
यावल प्रतिनिधी

तालुक्यातील तापी नदीच्या पात्रातुन सुरू असलेल्या अवैध गौण खनिज वाहतुकीला आळा घालण्यासाठी यावल तहसीलदार मोहनमाला नाझीरकर यांनी आज अत्यंत धाडसी कारवाई केली. विदगाव (ता. यावल) परिसरात ही कारवाई सुरू असताना एक अवैध गौणखनिज भरलेला ट्रॅक्टर भरधाव वेगाने पळवण्यात येत असल्याचे निदर्शनास



येताच, तहसीलदार नाझीरकर यांनी आपल्या पथकासह स्वतः त्या वाळूच्या ट्रॅक्टरचा पाठलाग सुरू केला.

पाठलाग दरम्यान,त्यांच्या शासकीय वाहन क्रमांक एमएच १९ सिव्ही०४१९ या वाहनाचा ताबा सुटून ते थेट नदी पात्रात उलटले. या अपघातात तहसीलदार व त्यांच्या पथकातील सर्व सदस्य सुदैवाने सुखरूप बचावले असून कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र शासकीय वाहनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने वृत्त आहे.

सदरच्या घटनेची माहिती मिळताच जळगावच्या तहसीलदार डॉ.उमा ढेकळे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली व जेसीबीसह बचावकार्य सुरू करण्यात आले. प्रशासनाच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला. या प्रकरणी संबंधित ट्रॅक्टर चालक व अन्य जबाबदार व्यक्तींविरोधात यावल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

यावल प्रशासनाच्या कार्यक्षमतेचे आणि महिलांच्या नेतृत्वाचे हे सशक्त उदाहरण ठरले आहे.

''पोटासाठी खटपट करिसी अवघा वीळ।
राम राम म्हणता तुझी बसली दातखीळ।।१।।
हरीचे नाम कदा काळी का रे नये वाचे।
म्हणता राम राम तुझ्या बाचे काय वेचे।।२।।
द्रव्याविया आशा तुजला दाही दिशा न पुरती।
कीर्तनासी जाता तुझी जड झाली मती।।३।।
तुका म्हणे ऐशा जीवा काय करु आता।
राम राम न म्हणे त्याचा गाढव मातापिता।।४।।
(१९८३)''

# जो नामस्मरण भक्ती करित नाही त्याचे आई-वडील गाढव

**असे तुकाराम महाराजा म्हणतात.. पोटापाण्यासाठी काम करायला तुला सर्व वेळ मिळतो, पण राम-राम नामस्म्रण करायला तुझी दातखीळ बसते. तुला वेळ नाही. द्रव्य प्राप्तीसाठी तुला दाही दिशा पुरत नाही, त्यासाठी कुठेही जायला तयार असतो, पण कीर्तन प्रवचन सत्संग येथे जायला तुझी बुध्दी जड होते.**

तुकाराम महाराज रागावून शेवटी म्हणतात जो ईश्वर भक्ती करीत नाही अशा माणसाला काय म्हणावे? जो नामस्मरण भक्ती करित नाही त्याचे आई-वडील गाढव आहेत. संत जगाला उपदेश करुन कंटाळतात, शेवटी रागावून बोलतात, पण त्यांच्या रागावण्यात ही जगाचे कल्याण असते.

संतांचे रागावणे आईचे मुलावर रागावण्यासारखे असते.ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ''माऊलीच्या कोपी। स्नेह आथी।'' आईच्या रागावण्यात सुद्धा प्रेम असते.

ज्ञानदेव म्हणे हरिजप करणे। तुटेल धरणे प्रपंचाचे।।

ज्या प्रपंचाची चिंता माणसे करतात त्याच्या बंधनातून सुटण्याचा एकच उपाय आहे, हरिनामाचा जप करणे। अध्यात्मिक साधना करणे। मनुष्य कष्टाने प्रपंच करतो पण त्या प्रपंच्याच्या बंधनातून सुटण्याचा प्रयत्न करीत नाही. जर अध्यात्मिक साधना केली तर मनुष्य संसारातील सर्वच बंधनातून कायमचा मुक्त होतो, व खरा सुखी होतो.

ज्ञात्वा देवं सर्वपाशापहानिः,
क्षीणैः क्लेशैर्जन्ममृत्युप्रहाणिः।
तस्याभिध्यानात् तृतीयं देहभेदे,




विश्वैश्वर्यं केवल आप्तकामः।।
।।श्वेताश्वतर उपनिषद -३-११।।

त्या सर्वव्यापी ईश्वराला जो प्रत्येकाच्या अंतऱ्यामी आहे, त्याला जाणल्याने, मनुष्य सर्व प्रकारचे क्लेश, बंधने व दु:खे यातून कायमचा मुक्त होतो, व दिव्य आत्मसुखाला, ईश्वरीय ऐश्वऱ्याला प्राप्त करतो.

''योग याग विधी येणे नोहे सिध्दी।
वायाचि उपाधी दंभ धर्म।।१।।
भावेविण देव न कळे नि:संदेह।
गुरुविण अनुभव कैसा कळे।।२।।
तपेविण दैवत दिधल्याविण प्राप्त।
गुजेविण हित कोण सांगे।।३।।
ज्ञानदेव सांगे दृष्टांताची मात।
साधूची संगती तरणोपाय।।४।।
योगयाग विधी येणे नोहे सिध्दी।

वायाचि उपाधी दंभ धर्म।।

स्वत: ज्ञानेश्वर महाराज योगी होते, त्यांना योग्यांचा राजा म्हटले आहे, तरी, योग शास्त्र एवढे श्रेष्ठ आहे, तरी या अभंगात असे का म्हटले आहे? योगयागाने (ईश्वर) सिध्दी प्राप्त होत नाही? कारण, योगाचे अनेक प्रकार आहेत, हठयोग, लय, राज योग, इत्यादि। येथे सिध्दयोगा बद्दल सांगीतले नाही. सिध्दयोग गुरुकृपेने होणारा सर्वश्रेष्ठ सहज योग आहे. या अभंगात स्वत:च्या प्रयत्नाने जेव्हा साधक हठयोगादि करतो, तेव्हा त्याला अनेक संकटे येतात, खूप कष्ट पडतात. कठीण नियमांचे पालन करावे लागते, तरी सुध्दा गुरु शिवाय हठयोग करणे धोकेदायक असते, अर्धवट कुंडलिनी जागृत झाल्यास दुष्परिणाम ही होतात। तसेच महत् प्रयासांनी साध्य केला तरी अनेक सिध्दींच्या मोहात साधक अडकतो व त्याचे पुन: अध:पतन होते. त्यामुळे अशा योगाची येथे निंदा केली आहे.
क्रमशः



डॉ. गोरखनाथ सुकदेव देवरे
रिटायर्ड मेडीकल ऑफिसर नांदगाव,
जि. नाशिक मो.९८२२४२८५७२

दैनिक लोकशाही 'लोक'राज्य next

# जळगाव जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे पंधरा वर्षे आतील मुलींसाठी निवड चाचणी

**जळगाव :** महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन च्या निमंत्रितांच्या पंधरा वर्षाखालील मुलींच्या स्पर्धेसाठी जळगाव जिल्ह्याची निवड चाचणी शनिवार दिनांक १० मे २०२५ रोजी सकाळी आठ तीस वाजता जैन स्पोर्ट्स अकॅडमी चे मैदान विद्या इंग्लिश स्कूल मागे डी मार्ट जवळ जळगाव येथे आयोजित करण्यात आली आहे ज्या मुलींचा जन्म दिनांक १/९/२०१० ते ३१/८/२०१३ दरम्यान झाला आहे ह्याच मुली या निवड चाचणी साठी पात्र असतील. अशा पात्र मुलींनी क्रिकेट च्या पांढऱ्या गणवेशात व क्रिकेट किट सह मैदानावर उपस्थित रहावे असे जळगाव जिल्हा क्रिकेट असोसिएशन तर्फे अध्यक्ष श्री अतुल जैन, सचिव श्री अरविंद देशपांडे व सहसचिव अविनाश लाठी यांनी कळविले आहे.

## महत्वाचे

### पाकिस्तानशी लढताना जवान मुरली नाईक शहीद



**मुंबई :** जम्मू-काश्मीरच्या उरी सेक्टरमध्ये पाकिस्तानच्या सैन्याशी लढताना मुंबईतील जवान मुरली नाईक शहीद झाले. भारतीय वायू दलाने पाकिस्तानी सैन्याचे दोन विमाने पाडली आणि सीमारेषेवर गोळीबार सुरू आहे. शहीद जवान मुरली नाईक हे २३ वर्षांचे होते. त्यांचे वीरमरण समजताच, त्यांच्या कुटुंबीयांसह संपूर्ण गाव शोकसागरात बुडाले आहे. मुरली नाईक मूळचे आंध्र प्रदेशातील असून त्यांचे वडील श्रीराम नाईक मुंबईतील घाटकोपर भागात मजुरीचे काम करत होते. आपल्या मुलाला सैन्यदलात भरती करण्यासाठी त्यांनी अनेक संकटांना तोंड दिलं. २०२२ मध्ये भारतीय सैन्यात नोकरी लागलेले मुरली नाईक यांची ट्रेनिंग देवळाली, नाशिक येथे झाली होती. त्यानंतर आसाम, पंजाब आणि उरी सेक्टरमध्ये त्यांना तैनात करण्यात आले होते. त्यांच्या शहीद होण्याचे वृत्त मिळताच मुंबईतील कुटुंबीय, स्थानिक लोक आणि आंध्र प्रदेशमधील गावकऱ्यांनी शोक व्यक्त केला. मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी ट्विट करून श्रद्धांजली अर्पण केली. शहीद जवान मुरली नाईक यांच्या पार्थिवाची अंत्यविधी १० मे रोजी त्यांच्या मूळ गावी आंध्र प्रदेशातील कल्की तांडा येथे होणार आहे.

### पत्रकार अटकेत; माओवादी वादग्रस्त पोस्टमुळे कारवाई

**नागपूर :** मागच्या २ दिवसांपासून भारत आणि पाकिस्तानमध्ये मोठ्या प्रमाणात तणाव वाढला आहे. काही दिवसांपूर्वी जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा भारताने बदला घेतला आहे. भारताने पाकिस्तानातील ९ दहशतवादी ठिकाणांवर एअर स्ट्राईक केला. या हल्ल्यात १०० हून अधिक दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला. यानंतर पाकिस्तानने काल रात्री भारतावर प्रतिहल्ला केला. भारतानेदेखील त्याला चोख प्रत्युत्तर दिले. यानंतर आता दोन्ही देशातील संघर्ष वाढला आहे. यादरम्यान नागपूरमध्ये एका पत्रकाराला अटक करण्यात आली आहे. हाती आलेल्या माहितीनुसार माओवाद्यांशी कनेक्शन असल्याच्या कारणातून लकडगंज पोलिसांनी पत्रकाराला अटक केली आहे. तसेच त्याच्या मैत्रिणीला चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. रेजाज एम. शीबा सिदीक (एडापल्ली, केरळ) असे अटक केलेल्या पत्रकाराचं नाव आहे. मैत्रीण ईशा असं ताब्यात घेतलेल्या तरुणीचं नाव आहे.

# संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची तिन्ही सैन्यदलाच्या प्रमुखांसोबत बैठक

## सीडीएस अनिल चौहान यांचीही उपस्थिती

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नवी दिल्ली** प्रतिनिधी

भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढत असून युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान, ८ मेच्या मध्यरात्री भारताने पाकिस्तानला दणका देत त्यांचे हल्ले परतवून लावले. त्यानंतर शुक्रवारी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी भारताच्या तिन्ही दलांचे प्रमुख, संरक्षण सचिव, डीआरडीओ प्रमुख आणि लष्कर प्रमुख (सीडीएस) अनिल चौहान यांच्यासोबत एक बैठक घेतली. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आणि संघर्षाच्या पार्श्वभूमीवर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी गुरुवारी सांगितले



की, भारत कोणत्याही सीमा आपल्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्यात अडथळा बनू देणार नाही आणि त्यासाठी भारत पूर्णपणे तयार आहे. त्यापुर्वी बुधवारी रात्री उत्तर आणि पश्चिम भारतातील १५ ठिकाणी भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तानी लष्कराचे क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले उधळून लावले आणि लाहोरमध्ये पाकिस्तानी हवाई संरक्षण प्रणाली निष्क्रीय केली होती.

# पाकिस्ताननं माघार घ्यावी

## अन्यथा...सीएम ओमर अब्दुल्ला यांचा इशारा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जम्मू** प्रतिनिधी



भारताने सुरु केलेल्या ऑपरेशन सिंदूरमुळे पाकिस्तानची घाबरगुंडी उडाली. दरम्यान, पाकिस्तानी सैन्याकडून जम्मू आणि काश्मीरमधील सीमेवर गोळीबार सुरुच आहे. त्याला भारतीय सैन्यही चोख प्रत्युत्तर देत आहेत. पाकिस्तानच्या गोळीबारात आतापर्यंत १५ जणांचा मृत्यू झाला असून सुमारे ५० जण जखमी झाले आहेत. दरम्यान, अशा परिस्थितीत जम्मू- काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी सांबा येथे सुरक्षित छावणीत राहणाऱ्या स्थानिक नागरिकांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. ओमर अब्दुल्ला भारत-पाकिस्तानदरम्यान वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर बोलताना म्हटले की, ''पाकिस्तानने सैन्याने नागरिकांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी त्यासाठी ड्रोनचा वापर केला. पण भारतीय सैन्याने त्यांचे ड्रोन पाडले आणि त्यांचा हल्ल्याचा प्रयत्न हाणून पाडला. याचे श्रेय आपल्या संरक्षण दलांना जाते.

# साश्रुनयनांनी शहीद सचिन वनंजेंच्या पार्थिवावर लष्करी इतमामात अंत्यसंस्कार

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**देगलूर** प्रतिनिधी

भारतीय सैन्यदलात कार्यरत असलेले जवान सचिन यादवराव वनंजे यांचा देशसेवेच्या कर्तव्यावर असतांना श्रीनगरच्या परिसरात दि.६ मे रोजी अपघाती मृत्यू झाला होता. त्यांच्यावर आज दि.९ मे रोजी देगलूर येथे अत्यंत शोकाकूल वातावरणात साश्रुनयनांनी शहीद सचिन वनंजे यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी खासदार, आमदार यांच्यासह



हजारो चाहत्यांची उपस्थिती होती.
या घटनेची माहिती भारतीय सैन्यदलाअंतर्गत कुटुंबियांना मिळताच तालुक्यातील तमलूरसह देगलूरवर शोककळा पसरली होती. दरम्यान भारतीय सैन्यदलाचे उमेश बोहरा यांच्यासह शहीद सचिन वनंजेचा पार्थिव दि.९ मे रोजी देगलूर येथील सचिनच्या राहत्या घरी पहाटे ४.०० वाजण्याच्या दरम्यान दाखल होताच परिवारातील सदस्यांसह उपस्थितीतांच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या.

# सावदा रुग्णालयाच्या नामकरणासाठी उपोषणाचा इशारा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**सावदा** प्रतिनिधी

सावदा येथील नगरपालिकेच्या मालकीचे रुग्णालय २०१० साली शासनाकडे वर्ग करण्यात आले असून, त्यावेळी ''राजेश्री छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय'' हे नाव कायम ठेवण्याच्या अटीवर ही हस्तांतरण प्रक्रिया पार पडली होती. मात्र, तब्बल १४ वर्षांनंतरही शासनाकडून रुग्णालयाचे नामकरण झाले नसल्यामुळे नागरिकांत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.
शासनाच्या व जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाच्या हलगर्जी व आडमुठ्या धोरणाचा निषेध म्हणून भारतीय जनता पार्टी, शिवसेना महायुती व तमाम शिवप्रेमी नागरिकांच्या वतीने दिनांक १९ मे २०२५ रोजी एक दिवसीय लाक्षणिक उपोषण रुग्णालयासमोर करण्यात येणार आहे.
या संदर्भात जिल्हा शल्यचिकित्सक यांना सादर करण्यात आलेल्या पत्रात स्पष्ट इशारा देण्यात आला आहे की, जनभावनांचा आदर करत रुग्णालयास तत्काळ ''राजेश्री छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय'' हे नाव देण्यात यावे. अन्यथा जनआंदोलन अधिक तीव्र केले जाईल.
हा विषय केवळ नावाचा नसून जनतेच्या आत्मसन्मानाचा असल्याचे भाजप व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी सांगितले. यासंदर्भातील ठराव सन १९९९-२००० पासून अस्तित्वात असून, २०१० साली नगरपालिकेने तो ठराव शासनाकडे वर्ग करताना पुन्हा एकदा अधोरेखित केला होता. दरम्यान, उपोषणात सहभागी होणाऱ्यांमध्ये राजेंद्र श्रीकांत चौधरी (जिल्हा उपाध्यक्ष, भाजपा), सुरज परदेशी (शहरप्रमुख, शिवसेना), जितेंद्र भारंबे (शहराध्यक्ष, भाजपा) यांच्यासह भाजप, शिवसेना कार्यकर्ते व शहरातील सर्व शिवप्रेमी नागरिक सहभागी होणार आहेत.

## शरद पवारांच्या कबुलीनंतर सुप्रिया सुळे म्हणाल्या, जर...

# दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**सातारा** प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची दोन गटात फाटाफूट झाल्यानंतर पहिल्यांदाच आपल्या पक्षाचे काही आमदार अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेससोबत जाण्यास इच्छूक असल्याची कबुली शरद पवारांनी गुरूवारी दिली. यानंतर सुप्रिया सुळे यांनी ''जर शरद पवार साहेब याबद्दल बोलले असतील, तर मी याच्याबाबत काय बोलणार,'' असे म्हणत माध्यमांच्या प्रश्नाला बगल दिली.
आज साताऱ्यात पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची ६६ वी पुण्यतिथी कार्यक्रमानिमित्त खासदार शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे तसेच मंत्री मकरंद पाटील, आमदार रोहित पवार, आमदार शशिकांत शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमामध्ये सर्व नेत्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या समाधीला अभिवादन करून राज्यातील उत्कृष्ट शिवछत्रपती पुरस्कार विजेते आणि उत्कृष्ट खेळाडूंचा सत्कार केला. त्यानंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याबाबत दोन मतप्रवाह आणि शरद पवार यांची जाहीर कबुली याबाबत त्यांना विचारले असता, त्या म्हणाल्या, ''मला याची काहीच कल्पना नाही, मी काल दिल्लीला असल्याने मला याबाबत काहीही माहिती नाही. जर शरद पवार साहेब याबद्दल बोलले असतील, तर मी याच्याबाबत काय बोलणार. मी जोपर्यंत माहिती घेत नाही, तोपर्यंत भाष्य करू शकत



नाही. सगळ्यांशी चर्चा करून मी बोलेन.

### शरद पवार काय म्हणाले ?

पुन्हा एकत्र येण्याबाबत पक्षात दोन वेगवे-गळे मतप्रवाह असल्याचे मान्य करतानाच आपला पक्ष इंडिया आघाडीसोबतच राहील आणि भाजपविरोधात लढत राहील, अशी स्पष्ट भूमिकाही त्यांनी मांडली आहे. एका अग्रगण्य इंग्रजी दैनिकाला दिलेल्या एका विशेष मुलाखतीत पवारांना या विषयावर प्रश्न विचारण्यात आले तेव्हा त्यांनी ही भूमिका मांडली. खासदार सुप्रिया सुळे यांच्याबाबत विचारलेल्या प्रश्नावर, संसदेत विरोधी पक्षात बसायचे कि नाही याचा निर्णय तिने घ्यायचा आहे, असे उत्तर शरद पवार यांनी दिले आहे. पक्षाबाबत निर्णय घेण्याचा अधिकार पवार यांनी सुप्रिया सुळे यांना दिल्याचे संकेत त्यांच्या या उत्तराने गेल्याने दोन्ही पक्ष पुन्हा एकत्र येऊ शकतात, अशा चर्चांना राजकीय वर्तुळात उधाण आले आहे.

# माजी आयपीएस अधिकाऱ्याला 50 लाखाचा गंडा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पुणे** प्रतिनिधी

शेअर मार्केटमधील गुंतवणुकीवर चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवत माजी आयपीएस अधिकाऱ्याला ५० लाखांचा गंडा घालण्यात आला आहे. याप्रकरणी डेक्कन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपीने दुबईत पळ काढला असल्याची प्राथमिक माहिती आहे.
वाकड येथे राहणाऱ्या ८० वर्षीय माजी आयपीएस अधिकाऱ्याने तक्रार दिली आहे. त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, राजीव अशोक केंद्रे (सध्या दुबई, मूळ लातूर) आणि हर्षल अशोक कुलकर्णी( रा. कोथरुड) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपी राजीव याच्यावर अगोदर दोन गुन्हे दाखल आहेत. त्यांनी डेक्कन येथील



आरोपीच्या कार्यालयास भेट दिली होती. आरोपी राजीव केंद्रे योग्य प्रकारे शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करून चांगला परतावा देतात, अशी माहिती त्यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांनी कार्यालयात भेट दिली असता, त्यांना चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवण्यात आले. त्यानुसार फिर्यादीने धनादेशाव्दारे ५० लाखांची गुंतवणूक केली. मात्र, परतावा मिळत नसल्याने त्यांनी कार्यालयात धाव घेतली. तेव्हा त्यांना कार्यालय बंद असल्याचे आढळले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली.

# यात्रा-जत्रांसाठी लोककलावंतांचा महाराष्ट्रभर प्रवास

## यंदाचा सीझन ठरतोय कमाईचा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पुणे** प्रतिनिधी

लावणीपासून ते महाराष्ट्राची लोकधारापर्यंत... शाहिरीपासून ते जागरण, या महाराष्ट्राच्या मातीतील अस्सल लोककला... चैत्र पाडव्यानंतर यात्रा-जत्रांचा सीझन सुरू झाल्यावर खर्या अर्थाने लोककलांच्या कार्यक्रमांचीही संख्या वाढते... यंदाही असेच चित्र आहे... चैत्र पाडव्याला यात्रा- जत्रा सुरू झाल्यानंतर महाराष्ट्रातील शहरी भागांसह ग्रामीण भागांतही लोककलांचे कार्यक्रम रंगू लागले आहेत. त्यामुळेच आता लोककलावंतही महाराष्ट्रभर दौरे करून कलेचे सादरीकरण करत आहेत.
यावर्षी लोककलांच्या कार्यक्रमांना चांगले बुकिंग मिळाले आहे आणि त्याचा आर्थिक फायदाही कलावंतांना होत आहे. मे महिन्याच्या अखेरपर्यंत लोककलांचा कार्यक्रम रंगणार असून, कलावंतांसाठी यंदाचा सीझन आनंद घेऊन आला आहे.
सध्या ग्रामीण भागात यात्रा- जत्रा सुरू झाल्या असून, लोककलांच्या कार्यक्रमांना यात्रा- जत्रांमध्ये प्रतिसाद असतो. यंदाही हाच प्रतिसाद पाहायला मिळत असून, लोककलावंत कार्यक्रमांसाठी



राज्यभर प्रवास करीत आहेत.
तमाशा, लावणी, महाराष्ट्राची लोकधारा या कार्यक्रमांना सर्वाधिक प्रतिसाद आहे. खास करून कोल्हापूर, सातारा, सांगली, नाशिक, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, धाराशिव, अहिल्यानगर आदी ठिकाणी लोककलांचे कार्यक्रम होत असून, कलावंतांना विविध संस्थांकडून कार्यक्रमांसाठी विचारणा होत आहे. त्यामुळेच लोककलावंतांचा संपूर्ण समूह कार्यक्रमांसाठी ठिकठिकाणी दौरे करत आहे.

### या लोककलांचे सादरीकरण

शाहिरी असो वा भारूड... कीर्तन असो वा वासुदेव... अशा लोककलांनी महाराष्ट्राच्या मातीला समृद्ध केले. लोककलांच्या कार्यक्रमांना कोकण विभाग असो वा जळगाव... विविध जिल्ह्यांमध्ये प्रतिसाद मिळत असून, शाहिरी, वासुदेव, पोतराजसह महाराष्ट्राची लोकधारा आदी कार्यक्रमांचे सादरीकरण कलाकार करत आहेत.

# एकनाथ शिंदेंचं वक्तव्य; "सोशल मीडियावरुन खोट्या बातम्या पसरवल्यास...

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

भारत आणि पाकिस्तानातील तणावाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पोलिस आणि प्रशासकीय यंत्रणेकडून राज्यातील एकूणच सुरक्षा आणि सज्जतेचा आढावा घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते. एकनाथ शिंदे यांनी यानंतर बैठकीबाबत माहिती दिली.

**सोशल मीडियावरुन खोट्या बातम्या पसरवल्यास कारवाई-एकनाथ शिंदे**

येत्या दोन ते तीन दिवसांत नौदल, वायूदल, लष्कर, भारतीय तटरक्षक दल यांच्याशीही चर्चा होईल. महाराष्ट्र शासनाकडून जे काही सहकार्य हवं असेल त्याबाबतही चर्चा होईल. आज सुरक्षा सचिवांची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेत झाली आहे. मुंबई आणि महाराष्ट्र कुठल्याही परिस्थितीत सुरक्षित ठेवला जाईल या पद्धतीने सगळ्यांनाच अलर्ट करण्याची चर्चा आज झाली. तसंच खोट्या बातम्या सोशल मीडियावरुन पसरवल्या जातात तो गंभीर गुन्हा आहे. त्यावरही कठोर कारवाई झाली पाहिजे याबाबतही चर्चा आणि निर्णय झाला आहे. लोकांना आमची विनंती आहे की सैन्य दलांकडून, तट रक्षक दलांकडून जी काही तयारी केली जाते आहे त्याचं चित्रीकरण करुन, व्हिडीओ काढून प्रसारित करु नये. सुरक्षेच्या दृष्टीने ते महत्त्वाचं आहे, त्याबाबतही चर्चा झाली. असंही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी सांगितलं.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले निर्देश पुढीलप्रमाणे**

प्रत्येक जिल्ह्यात मॉकड्रिल करा आणि जिल्हा स्तरावर



वॉर रूम स्थापित करा. ब्लॅकआऊटवेळी हॉस्पिटलसोबत समन्वय यंत्रणा उभी करा. टार्गेट होऊ नये म्हणून लाईट बंद केले जातात, त्यामुळे पर्यायी विद्युत व्यवस्थेद्वारे यंत्रणा सुरू ठेवून, गडद रंगाचे पडदे अथवा गडद रंगाच्या काचा वापरून त्याचवेळी बाहेरून लाईट दिसणार नाही, अशी व्यवस्था करा. ब्लॅकआऊट म्हणजे काय आणि अशावेळी काय करावे, यांचे व्हिडिओ विद्यार्थी, नागरिकांपर्यंत पोहोचवा. व्यापक जनजागरण करा. केंद्र सरकारच्या 'युनियन वॉर बुक' चे सखोल अध्ययन करीत सर्वांना त्याची माहिती द्या. प्रत्येक जिल्ह्यात पोलिसांच्या सायबर सेलने समाजमाध्यमांवर देखरेख ठेवत पाकिस्तानला मदत करणारे हॅण्डल ओळखून त्यावर कारवाई करा. शत्रूला मदत करणारी अथवा चुकीची माहिती कुणी प्रसारित करीत असेल तर त्यावर कारवाई करा. प्रत्येक जिल्हाधिकारी यांना आपत्कालीन फंड आजच देणार, ज्यातून काही तातडीच्या साहित्याची खरेदी करायची असतील तर ती तत्काळ करता येईल. याव्यतिरिक्त कोणताही महत्वाचा प्रस्ताव यासंदर्भात आला तर तो १ तासात मंजूर करा. एमएमआर क्षेत्रातील सर्व महापालिकांची बैठक घ्या, त्यांनाही 'ब्लॅकआऊट' बाबत जागरूकता निर्माण करण्यास सांगा. यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांना सहभागी करून घ्या. पोलिस विभागाने नेहमीपेक्षा जास्त जागरूकता ठेवावी.

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे काय म्हणाले ?

सुरक्षेच्या दृष्टीने उपाय करणे, लोकांना निर्देश देणं. मॉक ड्रील काही ठिकाणी झालं आहे. काही ठिकाणी होणार आहे. लोकांना निर्देश सायरनच्या माध्यमातून दिले जातील किंवा मोबाइल ॲपच्या माध्यमातून दिले जातील. कोस्टल एरिया, पोलीस यांच्या समन्वयावर चर्चा झाली असंही एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. सुरक्षेच्या दृष्टीने जे आवश्यक आहे ते उपलब्ध करुन देण्याबाबत चर्चा झाल्याचंही त्यांनी सांगितलं. राज्यातल्या सुरक्षा सचिवांशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी चर्चा केली. त्यानंतर या बैठकीत काय चर्चा झाली ते सांगितलं.

हे पत्र लोकशाही इनोवेशन्स प्रायव्हेट लिमिटेड मालकीचे त्यांच्या वतीने मुद्रक, प्रकाशक, संपादिका शांता कमलाकर वाणी यांनी लोकशाही इनोवेशन्स प्राइवेट लिमिटेड एम-१८१, एमआयडीसी जळगाव जिल्हा जळगाव ४२५००२ (महाराष्ट्र) येथून छापून २२०, बळीराम पेठ, जळगाव जिल्हा जळगाव ४२५००१ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले.
This LOKSHAHI newspaper is owned by Lokshahi Innovations Private Limited and printed on its behalf by Shanta Kamalakar Wani, Printer, Publisher, Editor at Lokshahi Innovations Private Limited M-181, MIDC Jalgaon District Jalgaon 425002 (Maharashtra). Published at 220, Baliram Peth, Jalgaon District Jalgaon 425001 Maharashtra.आर.एन.आय.नं MAHMAR/२००९/३३०२८ पोस्टल रजी. नंबर - No.JAL/16/2024-26 EMail- lokshahilive@gmail.com, वर्ष १६ वे. जळगाव फोन नं. ०२५७-२२३७४९१,२२४१४९१,२९७०३६८.
संपर्क कार्यालय: मुंबई- १०, शंकेश्वर सोसायटी, मानपाडा रोड, नवजीवन हॉस्पीटल समोर, डोंबीवली पूर्व जि. ठाणे, मो. नं. ९४२२२८४५११. सहाय्यक संपादक राजेश यावलकर, सल्लागार संपादक धों. ज. गुरव, (पी. आर. बी. कायद्यानुसार) संपादकीय जबाबदारी यांची आहे.